# डिझास्टर रिलीफ फंड संकलन उपक्रम

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले तसेच अनेक विद्यार्थी व युवकांचे शैक्षणिक आयुष्य अडचणीत आले. या पार्श्वभूमीवर करिअर कट्टा विभाग यांच्याकडून आपत्तीग्रस्त नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी मदतीचे आवाहन करण्यात आले.

या आवाहनास महाविद्यालयाच्या करिअर संसदेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिनांक 9 ऑक्टोबर 2025 रोजी "डिझास्टर रिलीफ फंड संकलन उपक्रम" राबवण्यात आला. निधी संकलनासाठी दोन बॉक्स तयार करण्यात आले. ऑनलाईन मदतनिधी जमा करण्यासाठी दोन्ही बॉक्सवर UPI पेमेंट साठी QR कोड लावण्यात आला. या उपक्रमाचे नेतृत्व करिअर संसदेतील पदाधिकाऱ्यांनी केले.

उपक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर यांच्या हस्ते प्रातिनिधिक देणगी जमा करून करण्यात आली. त्यानंतर प्राध्यापक, विद्यार्थी व कार्यालयीन कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला व मनापासून योगदान दिले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सहकार्याची भावना आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा निर्माण झाली. तसेच "गरजूंसाठी मदत करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे" ही जाणीव प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात दृढ झाली.

निधी संकलन पूर्ण झाल्यानंतर जमा झालेला निधी माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राकडे (Information Technology Support Centre) सुपूर्द करण्यात आला.

या उपक्रमात मा. प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर, करिअर कट्टा समन्वयक प्रा. विठ्ठल बोंदर व डॉ. सुरेश सुर्यवंशी, करिअर संसदेतील पदाधिकारी अतुल चौधरी, ओम सोनवणे, स्वेजल उके, सागर वानखेडे व प्रशम बडोले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य करून सामाजिक बांधिलकीचे सुंदर उदाहरण साकारले.



















**Maharashtra Information Technology Support Centre**

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र**

322

Mahila Bank Basement,
Khasbag Maidan, Kolhapur-416012. | www.mitsc.co.in

नाव : डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर (Disaster Relief Fund)

पावती नं.: 0322

दिनांक : 10 10 2025

सभासद नोंदणी शुल्क : —

प्रशिक्षण शुल्क : —

परीक्षा शुल्क : —

CSR/ देणगी (U/S80G) : ✓

इतर : —

अक्षरी रुपये : अकरा हजार एक रुपये फक्त

₹ 11,001/-

☐ UPI Payment ☐ Cash ☐ Cheque ☑ Bank Transfer

अधिकृत स्वाक्षरी

## अवती-भवती



### डॉ. आंबेडकर कॉलेजद्वारे 'रिलीफ फंड संकलन'

**नागपूर :** गेल्या काही महिन्यांपूर्वी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. तसेच अनेक विद्यार्थी व युवकांचे शैक्षणिक आयुष्य अडचणीत आले. या पार्श्वभूमीवर दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या 'करिअर कट्टा' विभागातर्फे आपत्तीग्रस्त नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी मदतीचे आवाहन करण्यात आले तसेच यासाठी 'डिझास्टर रिलीफ फंड संकलन उपक्रम' राबविण्यात आला. प्रत्यक्ष निधी संकलनासह ऑनलाइन मदत करता यावी, यासाठी यूपीआय पेमेंटसाठी क्यूआर कोड लावण्यात आला. करिअर कट्टाच्या पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. या उपक्रमाची सुरुवात कॉलेजच्या प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर यांच्या हस्ते प्रातिनिधिक देणगी जमा करून करण्यात आली. त्यानंतर प्राध्यापक, विद्यार्थी व कार्यालयीन कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेत योगदान दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गरजूंना मदत करण्याबाबतची सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात आली. संकलित निधी माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राकडे सुपूर्द करण्यात आला. या उपक्रमात करिअर कट्टा समन्वयक प्रा. विठ्ठल बोंदर, डॉ. सुरेश सूर्यवंशी, करिअर संसदेतील पदाधिकारी अतुल चौधरी, ओम सोनवणे, स्वेजल उके, सागर वानखेडे व प्रशम बडोले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.